# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date: 11 June 2024

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ११ जून २०२४ दुपारी १.०० वा.

****

पेपर फुटीच्या आरोपांमुळे नीट-युजी २०२४ ही परीक्षा नव्यानं घेण्याच्या याचिकांवर सर्वोच्च न्यायालयात आज सुनवाणी झाली. सर्वोच्च न्यायालयानं राष्ट्रीय चाचणी संस्था, एनटीएला यासंदर्भात नोटीस बजावली आहे. तसंच विद्यार्थ्यांचं समुपदेशन थांबवण्याच्या मागणीला न्यायालयानं विरोध केला आहे. यासंदर्भात पुढील सुनावणी ८ जुलै रोजी होणार आहे.

****

नागरिकांनी योग आपल्या आयुष्याचा अविभाज्य भाग बनवावा, असं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. योगाभ्यासामुळे आयुष्यातील आव्हानांना सामोरं जाण्याचं बळ मिळतं, असं पंतप्रधान म्हणाले. पंतप्रधानांनी विविध आसनं आणि त्यांचं महत्व विशद करणारे व्हिडीओ समाजमाध्यमावर प्रसारीत केले आहेत. दरवर्षी २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात येतो.

****

केंद्रीय मंत्रीमंडळाचं खातेवाटप जाहीर झाल्यानंतर आज मंत्र्यांनी पदभार स्वीकारला. जे पी नड्डा यांनी आरोग्यमंत्रालयाचा पदभार स्वीकारला. तर, शिवराजसिंग चौहान यांनी कृषी मंत्रालयाचा पदभार स्वीकारला. आज होणाऱ्या बैठकीत कृषी मंत्रालयाकडून संकल्प पत्र तयार करण्यात येईल, असं शिवराजसिंग चौहान म्हणाले. ज्योतिरादित्य शिंदे यांनी दूरसंचार मंत्रालयाचा पदभार स्वीकारला. तर, गजेंद्रसिंह शेखावत यांनी सांस्कृतिक मंत्रालयाचा पदभार स्वीकारला.

बुलडाण्याचे खासदार प्रताप जाधव यांनी आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्रालयाच्या राज्यमंत्रीपदाचा पदभार स्वीकारला. याप्रसंगी आरोग्य सचिव अपूर्व चंद्रा यांची उपस्थिती होती. केंद्रीय मंत्री जयंत चौधरी यांनी कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाच्या राज्यमंत्रीपदाचा स्वतंत्र प्रभार म्हणून पदभार स्वीकारला. चिराग

पासवान यांनी अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयाचा पदभार तर, सुरेश गोपी यांनी पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू तसंच पर्यटन मंत्रालयाच्या राज्यमंत्रीपदाचा पदभार स्वीकारला.

****

मुंबई पोलीसांची २०२१ ची भरती प्रक्रीया पूर्ण करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केली आहे. मुंबई पोलिसांच्या २०२१ च्या प्रतिक्षा यादीतील उमेदवारांची कागदपत्रे आणि पोलीस पडताळणी पुर्ण झाली असून केवळ वैद्यकीय तपासणी करुन त्यांना नियुक्ती देणं बाकी आहे. या उमेदवारांची मुळ कागदपत्रे समांतर आरक्षणामुळे जमा करुन घेण्यात आली आहेत. त्यामुळे हे उमेदवार इतरत्र अर्ज देखील करु शकले नाहीत. ही गंभीर बाब असून गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याची दखल घेऊन हि प्रक्रिया तातडीनं पूर्ण करावी असं खासदार सुळे यांनी समाजमाध्यमावरील पोस्टमध्ये म्हटलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर शहरातील बियाणे विक्रेत्यांकडे आज सकाळी जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी अचानक भेट देऊन पाहणी केली. बियाणे विक्रेत्यांचं गोदाम, दुकानं तसंच त्यांच्याकडील विविध नोंदींची त्यांनी तपासणी केली. बियाणे खरेदीसाठी जमलेल्या शेतकऱ्यांशीही त्यांनी संवाद साधला.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदच्या समाज कल्याण विभागाच्या वतीने अंध, कर्णबधीर , अस्थिव्यंग या दिव्यांगाना यंदाच्या वर्षा करिता स्वयंरोजगार योजने अंतर्गत अर्ज मागवण्यात येत आहेत . अर्जदार १८ ते ५० वयोगटातला असावा आणि अर्जावरील सर्व अटी आणि शर्ती व्यवस्थित वाचून अर्ज करावेत असं आवाहन जिल्हा परिषदेचे समाज कल्याण अधिकारी ओमप्रसाद रामावत यांनी केलं आहे.

****

बीड जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून सर्वदूर जोरदार पाऊस पडत आहे. जिल्ह्यात अंबाजोगाई, घाटनांदूर, परळी वैजनाथ आणि धारूर या चार महसुली मंडळात अतीवृष्टीची नोंद जिल्हा प्रशासनानं केली आहे.

****

मराठवाड्यात परभणी, बीड, हिंगोली, नांदेड, लातूर आणि धाराशिव जिल्ह्यांत

तुरळक ठिकाणी, आज वादळी वारे आणि विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता हवामान खात्यानं व्यक्त केली आहे. छत्रपती संभाजीनगर आणि जालना जिल्ह्यात हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस होईल, असं हवामान खात्यानं म्हटलं आहे.

****

काँग्रेस पक्ष आजपासून उत्तरप्रदेश मधल्या सर्व ४०३ विधानसभा मतदारसंघात धन्यवाद यात्रा काढत आहे. काँग्रेस चे माजी अध्यक्ष राहुल गांधी आणि काँग्रेस महासचिव प्रियंका गांधी वाड्रा आज दुपारी रायबरेली इथे आभार सभेला संबोधित करुन या यात्रेचा शुभारंभ करतील आणि काँग्रेसला समर्थन दिल्याबद्दल रायबरेली आणि अमेठी च्या नागरिकांप्रती धन्यवाद व्यक्त करतील. येत्या १५ तारखेपर्यंत ही धन्यवाद यात्रा चालेल.

****